दैनिक
# मराठवाडा पत्र
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

शनिवार
८.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३०२
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 




# मी तोंड उघडले तर पंकजा मुंडेंचे मंत्रिपद जाईल

## करुणा मुंडे यांचा इशारा ; धनंजय मुंडे यांच्याकडे आकांची कमी नसल्याचा दावा



**मुंबई । वृत्तसेवा**

संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरक आहे तो कुठे आहे त्याचं काय झालं याची काहीच माहिती समोर येत नाही. ५० दिवसांहून अधिक काळ लोटला तरी कृष्णा आंधळेचा पत्ता लागत नाही, त्याची हत्या झाली असावी असा दावा करुणा मुंडे यांनी केला आहे. करुणा मुंडे पुढे बोलताना म्हणाल्या की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळेचा दोन महिने झाले तरी तपास लागत नाही. त्याला ठार मारले असेल असा दावा त्यांनी केला आहे. तर धनंजय मुंडे यांच्यासंदर्भात माझ्याकडे बरेच काही बोलण्यासारखे आहे. त्यांच्याकडे आकाची कमी नाही म्हणतानाच त्यांच्या आर्थिक गडबडीची माहिती योग्य वेळ आली की बाहेर काढणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### धनंजय मुंडे स्वतःला माफ करु शकतील?

करुणा मुंडे म्हणाल्या की, धनंजय मुंडेंची सवय आहे की, फुट टाका आणि राज्य करा. स्वतः तोंड उघडत नाही आणि माझ्या मुलाला उभे केले. माझा मुलगा फ्रस्टेशनमध्ये होता. आमचे काही बरे वाईट झाले तर हा माणूस स्वतःला माफ करु शकणार आहे का? बापाच्या सांगण्यावरुन त्याने स्टोरी टाकली. माझ्या मुलाला किती कॉल येत होते हे सर्वांनी बघितले आहे.

### ...तर पंकजा मुंडेंचेही मंत्रीपद जाईल

करुणा मुंडे म्हणाल्या की, तुम्ही मंत्री आहे, मी काही नाही. मी वाईट महिला हे मान्य करते. अनेक मोठ्या गोष्टी आहेत. मी तोंड उघडले धनंजय मुंडेंचेच नाही तर तर पंकजाताईंचे पण मंत्रिपद जाऊ शकते, असा दावा त्यांनी केला आहे. धनंजय मुंडे मला रोडवर सोडू शकत नाही मी त्यांची बायको आहे, आता मला बोलायचे असेल तर कॅबिनेटमध्ये येऊन बोलणार.

# एसपी नवनीत कॉवत ॲक्शन मोडवर

## गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ८० जणांना दिली तंबी



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे संपूर्ण राज्य हादरलेलं असताना बीडमधील गुन्हेगारी काही कमी होताना दिसत नाही. बीडमध्ये नुकतंच एका होमगार्ड असलेल्या तरुणाला तो वाल्मिक कराडच्या बातम्या पाहतो म्हणून त्याला जीवघेणी मारहाण करण्यात आली. त्याच्यावर लातूर येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेनंतर आता बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे चांगलेच क्शन मोडवर आले आहेत. नवनीत कॉवत यांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ८० जणांची चौकशी केली आहे. नवनीत कॉवत यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ८० जणांना तंबी दिली आहे. नवनीत कॉवत यांच्या या कारवाई बाबत बीडच्या एका पोलीस अधिकाऱ्याने प्रतिक्रिया देखील दिली आहे. एसपी नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्ह्यातील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ८० व्यक्तींना एसपी ऑफिसला बोलावलं. त्यांना तंबी देण्यात आली की, तुमची गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता तुमच्यावर गंभीर अशी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल. हद्दपार, मकोका सारख्या गंभीर कारवाया केल्या जातील, अशी माहिती एका पोलीस अधिकाऱ्याने माध्यमांना दिली.

# लाडकी बहीण योजनेतून ५ लाख लाभार्थ्यांना वगळले



**मुंबई । वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी लाभदायक ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या बदललेल्या निकषांची माहिती एक्सवर दिली आहे. या नव्या निकषांनुसार या योजनेतून पाच लाख महिला आता अपात्र ठरणार आहेत. जुलै २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ▶▶पान २ वर

### या महिलांना लाभ मिळणार नाही

दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येत आहे. अपात्र ठरविण्यात आलेल्या निकषांप्रमाणे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या २,३०,००० महिलांना वगळण्यात आले आहे. तसेच वय वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या १,१०,००० महिलांना योजनेतून अपात्र ठरविले गेले आहे. कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या आणि स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १,६०,००० महिला आहेत.

# वैजनाथ बांगरला पाच दिवसांची पोलीस कोठडी

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील अशोक मोहितेवर दोन जणांकडून जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. याप्रकरणी दोन्ही आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या होत्या. यातील एका आरोपीला धारूर न्यायालयात हजर करण्यात आले. धारुर न्यायालयाने याप्रकरणी आरोपी वैजनाथ बांगरला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर दुसऱ्या अल्पवयीन मुलाची बीडच्या बाल सुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील धारूर पोलीस ठाणे हद्दीत अशोक मोहिते याला वैजनाथ बांगर आणि एका अल्पवयीन मुलाने बेदम मारहाण केली. या मारहाणीत अशोक मोहिते गंभीर जखमी असून त्याच्यावर लातूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्ला झाल्यानंतर हे दोघेजण फरार झाले होते. पोलिसांनी विशेष पथकाद्वारे दोघांना कर्नाटक राज्यातून ताब्यात घेतले होते. बीडमधील सरपंच संतोष देशमुखांच्या हत्येनंतर जिल्ह्यातील गुन्हेगारीचे भयावह वास्तव समोर येत आहे. यावर सर्वच स्तरातून चिंता व्यक्त केली जात आहे. यातच अनेक राजकीय नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली असून आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरु आहे. अशातच बीडमधील धारूर येथून धक्कादायक बातमी समोर आली होती. देशमुख प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळेच्या मित्राने होमगार्ड असलेल्या अशोक मोहितेवर कोयत्याने ▶▶पान २ वर

**अशोक मोहिते मारहाण प्रकरण**

# खरेदी केंद्र बंद ; जिल्ह्यात लाखो टन सोयाबीन खरेदीविना

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने दिलेला खरेदी कोटा पूर्ण झालेला नसताना एकूण बीड जिल्ह्यातील नाफेडकडील ४४ हजार ७४४ या नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी फक्त २० हजार ९६९ एवढ्याच शेतकऱ्यांचा माल खरेदी केलेला आहे. म्हणजे ५०% सुद्धा शेतकऱ्यांचा माल खरेदी न करता देखील तारखांचे दाखले ▶▶पान २ वर

# बीड एमआयडीसीसाठी आ.क्षीरसागरांनी घेतली बैठक

## जमिन पाहणी; मुख्यमंत्र्यांशी केला पत्रव्यवहार



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या बीड येथील औद्योगिक वसाहत अर्थात एमआयडीसीच्या विकासाला गती मिळावी त्यातून तरुणांच्या हाताला रोजगार मिळावा व औद्योगिक विकासात बीड जिल्हा पुढे यावा यासाठी बीड विधानसभेचे आमदार संदीपभैय्या क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला आहे. याबाबत शुक्रवारी (दि.७) त्यांनी एमआयडीसी विभागाच्या ▶▶पान २ वर

# राखेच्या अवैध वाहतुकीवर प्रतिबंध घालावा

## मंत्री पंकजाताई मुंडेंचे जिल्हा प्रशासनाला आदेश

**बीड । प्रतिनिधी**

वीट भट्यासाठी मोकळया हायवामधून होणारी अवैध वाहतुकीमुळे प्रदुषण वाढत असून याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे तसेच खाली सांडलेल्या राखेमुळे वातवरणीय बदल रोखण्यासाठी बदं हायवामधून ही वाहतूक होईल याकडे संबधितांनी लक्ष घालून तसा अहवाल सादर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रगती सभागृहात जिल्हयातील अवैध वाळू व तत्सम गौण खनिज उत्खणनामुळे होणारा पर्यावरणाचा -हास, बीड जिल्हयातील अवैध डोंगर पोखरल्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी तसेच औष्णिक वीज प्रकल्प, परळी येथे होणा-या राखेच्या वाहतुकीमुळे होणारे प्रदुषण या बैठकी प्रसंगी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या. चिमणीपासूनचे प्रदुषण नियत्रंणात असले तरी राख उचलणे हे संबधित अधिका-यांचे दायित्व आहे याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. राखेचे अनाधिकृत साठे सील करावेत. वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावेत, राखेची वाहतुक मुख्य रस्त्यांवरून न करता ती बाह्य मार्ग अर्थात बायपास द्वारे करावी. दाऊतपूर एरियामध्ये किती राख आहे. याचे रेकार्ड ठेवणे राखेचा साठा आजमितीला आहे तेवढाच पुढील तपासणीपर्यंत ▶▶पान २ वर



### अवैध गौणखणिज वाहतुक

वाळू,दगड,माती,मुरुम, इतर खडी याची अवैध वाहतूक करणा-या किती लोकांवर कारवाई केली तसेच वाळू घाटांची संख्या किती. जप्त केलेली वाळू ही पंडीत दिन दयाळ उपाध्याय घरकूल योजनेसाठी वापरावी. गौण खणिजाचे अवैध उत्खणनावर प्रतिबंध घालावा असेही यावेळी श्रीमती मुंडे म्हणाल्या.

### डोंगराचे अवैध उत्खनन

डोंगराचे अवैध उत्खनन करणाऱ्यांना दंड करावा, दर ३ महिन्याला याचा अहवाल सादर करावा. डोंगराखाली होणारी प्लॉटींग अवैध असल्यास त्यावर प्रतिबंध घालावा. डोंगर पोखरल्यामुळे खाली राहणा-या कुंटूंबावर दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. असेही त्या यावेळी म्हणाल्या.

# बस्ता बांधण्यासाठी निघालेल्या कुटुंबावर काळाचा घात्रा

## केज-बीड रोडवर भीषण अपघात; दोघांचा मृत्यू

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कासारी येथील कुटुंब बस्ता बांधण्यासाठी नगरला निघाले असता केज पासून जवळच असलेल्या सांगवी (सा.) पाटी जवळ (दि.७) शुक्रवार रोजी अपघात होऊन मुलीच्या वडिलांसह एका महिलेला जीव गमावा लागला आहे. अधिक माहिती अशी कि, तालुक्यातील कासारी येथील रामेश्वर शाहूराव डोईफोडे यांच्या मुलीचे लग्न (दि.२३ फेब्रुवारी) रोजी होते. त्यामुळे मुलीचे वडील मुलीसह इतर नातेवाईकांना घेऊन नगरला बस्ता बांधण्यासाठी ▶▶पान २ वर

# दोन तरुणांची १२ लाखांची फसवणूक

**परळी । प्रतिनिधी**

सरकारी शाळेत शिपाई आणि क्लर्क पदावर नोकरी लावतो, असे आमिष दाखवून धिरज बद्रीनारायण बाहेती आणि दीपा धीरज बाहेती या दाम्पत्याने दोघा तरुणांकडून तब्बल १२ लाख रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी बाहेती दाम्पत्यावर परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निसर्ग अनंतराव जमशेटटे ▶▶पान २ वर



# किती काळ..?



अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय, मणिपूर, मिझोराम या ईशान्येकडील राज्यांच्या अर्थव्यवस्थेपेक्षाही अधिक आर्थिक आकारमान असलेल्या मुंबई महानगरपालिकेचा ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आयुक्त आणि सध्याचे प्रशासक भूषण गगराणी यांनी सादर केला. मुंबई शहराच्या विकासासाठी गगराणी यांनी विविध उपाय सुचविले आहेत. सद्या:स्थितीत ते त्यांनाच सुचवावे लागणार. कारण महापालिका अस्तित्वातच नाही. मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवकांची कारकीर्द संपली त्यास पुढील महिन्यात तीन वर्षे पूर्ण होतील. हा काळ आणखी किती लांबणार ते कोणालाच ठाऊक असण्याची शक्यता नाही आणि तो कमी व्हावा यासाठी उत्सुकताही असण्याची अपेक्षा नाही. निवडणुका लगेचच होण्याची शक्यताही दिसत नाही. सबब स्थायी समिती, त्यातील टक्केवारी, प्रभागांमधील अगदी छोट्या कामांमधील नगरसेवकांची चिरीमिरी हे सध्या बंद आहे. गेली तीन वर्षे नगरसेवक नाहीत म्हणून सामान्य मुंबईकरांस चुकल्या-चुकल्यासारखे होत असेल असेही नाही. याचाच दुसरा अर्थ महापालिका प्रशासकाच्या ताब्यात आहे म्हणून सर्वसामान्य मुंबईकरांच्या जीवनमानावर काही परिणाम झाला, असेही काही नाही. असे असले तरीही लोकशाहीतील व्यवस्थेनुसार लोकप्रतिनिधींची राजवट लवकर येणे आवश्यक आहे. नकटी असली तरी हरकत नाही; पण सौंदर्यवती हुकूमशाहीपेक्षा तीच बरी. तथापि मुंबईकरांस- तसेच राज्यातील दोन डझनहून अधिक महापालिकांमध्ये आणि २०० हून अधिक नगरपालिकांत-पुन्हा एकदा लोकशाहीचे वारे खेळू लागणे नितांत गरजेचे आहे. लोकशाहीविषयी वरून अनास्था आणि खालून उदासीनता हे काही बरे नाही. कारण लोकशाही व्यवस्थेत कागदोपत्री का असेना पण कोणीतरी सामान्य जनतेस उत्तरदायी असतो. फिरोजशहा मेहता, बोमन बेहराम, ई. मोझेस, बी. एन. करंजिया, स. का. पाटील आदी एकापेक्षा एक धुरंधरांनी भूषवलेले मुंबई महापालिकेचे महापौरपद अधिक काळ रिक्त ठेवणे मुंबईकरांवर अन्याय करणारे आहे. असो. या पार्श्वभूमीवर या प्रचंड महापालिकेच्या तितक्याच प्रचंड अर्थसंकल्पाविषयी. राज्य सरकारप्रमाणे मुंबई महापालिकेसमोरही लोकानुनयाचे गंभीर आव्हान उभे ठाकले आहे. आपल्याकडे निवडणुका म्हटले की मतांसाठी राजकारण्यांनी मतदारांना विविध प्रलोभने, सवलती देण्याची सर्रास परंपराच पडल्याचे दिसून येते. लाडकी बहीण, लाडका भाऊ, मोफत वीज अशा लोकप्रिय आणि हमखास मतांची हमी देणाऱ्या योजनांमुळे महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याची अर्थव्यवस्था ढेपाळली. हीच गत मुंबई महानगरपालिकेची. जकात कर रद्द झाल्यापासून मुंबई महानगरपालिकेची आर्थिक स्थिती काहीशी लंगडीच झाली होती. जकातीपाठोपाठ मालमत्ता कर हे पालिकेला महसूल मिळवून देणारे साधन. पण मतांसाठी ५०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी मालमत्तांना करात सवलत देण्यात आल्याने या श्रीमंत महापालिकेस मालमत्ता कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नावरही पाणी सोडावे लागल्याचे दिसते. तेव्हा महापालिकेचा हा एवढा मोठा गाडा चालणार कसा? तो हाकण्यासाठी पैसे आणणार कोठून? राज्याराज्यांच्या विक्री कराऐवजी 'वस्तू-सेवा कर' आकारणी सुरू झाल्याने राज्यांचे होणारे नुकसान जसे केंद्र सरकारने भरून देणे अपेक्षित आहे तशीच जकात बंद झाल्याने त्याची नुकसानभरपाई राज्य सरकारने देणे अपेक्षित आहे. त्यानुसार या अर्थसंकल्पात जकातीपोटी १४,३९८ कोटी रुपयांची नुकसानभरपाई यंदा अपेक्षित धरण्यात आली आहे. याचा सरळ अर्थ असा की आशियातील एकेकाळच्या सर्वात धनाढ्य वगैरे मुंबई महानगरपालिकेवरही अखेर शासनाच्या मदतीवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे मुंबईत सध्या सर्वत्र सुरू असलेल्या इमारतींच्या बांधकामांमुळे पालिकेला आर्थिक फायदा झाला. बांधकामांसाठी विकासकांना पालिकेला भराव्या लागणाऱ्या रकमेमुळे चालू आर्थिक वर्षात विकास नियोजन विभागाकडून ५८०० कोटी रुपयांचा महसूल अपेक्षित धरण्यात आला असता प्रत्यक्षात ८८०० कोटी मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पुढील वर्षी हा कर १० हजार कोटींच्या आसपास जाऊ शकतो, असा अंदाज आहे. तरीही पालिकेचा गाडा हाकण्यासाठी मुदत ठेवींना हात घालावा लागेल, असे सूतोवाच आयुक्तांनी केले आहे. मुदत ठेवींचा असा वापर करणे म्हणजे देशातील सर्वात श्रीमंत मुंबई महानगरपालिकेचा भव्य आणि मजबूत आर्थिक पाया डगमगू लागला असल्याचे लक्षण मानले जात असेल तर ते चुकीचे नाही. महापालिकेकडे ८० हजार कोटी रुपयांपेक्षाही अधिक रकमेच्या मुदत ठेवी आहेत. पालिकेने हाती घेतलेले विविध प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मुदत ठेवींचा वापर करण्याची आवश्यकता आयुक्तांनी सूचित केली. अशी वेळ येणे धोकादायक. हे म्हणजे घर चालवण्यासाठी पूर्वजांनी पुढच्या पिढीसाठी ठेवलेले दागदागिने मोडून खाण्यासारखे. वास्तविक मुदत ठेवी व त्यातून मिळणारे व्याज ही मुंबई महानगरपालिकेची मोठी जमेची बाजू मानली जाते. पण 'पैसे बँकेत ठेवण्यापेक्षा शहराच्या विकासासाठी खर्च करावे', असा उफराटा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच दोन वर्षांपूर्वी आपल्या मुंबई दौऱ्यात मुंबई महानगरपालिकेला दिला. तेव्हा खरे तर तो पालिका प्रशासनास मोठा धक्का होता. आता पंतप्रधानच पैसे बँकेत ठेवण्यापेक्षा खर्च करा, असा सल्ला देऊ लागल्यास मागचा-पुढचा कसलाही विचार न करता योजनांची घोषणा करणाऱ्या सत्ताधीशांसमोर अधिकाऱ्यांचाही नाइलाज होतो. तरीही गगराणी यांनी जास्त ठेवी मोडण्याचे टाळले हे दिलासाजनक. भविष्यात या ठेवीच पालिकेच्या उपयोगी पडू शकतात. पण हा दिलासा किती टिकाऊ असेल हे सांगता येणे अवघड. त्यामुळे महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला नवनवीन उपाय योजावे लागतील. याचाच भाग म्हणून आयुक्तांनी मुंबईतील सुमारे ५० हजार झोपड्यांमधील दुकाने, गॅरेजेस, लहान-मोठे उद्योग असा व्यावसायिक वापर करणाऱ्यांकडून कर वसूल करण्याची योजना मांडली. ते योग्यच. याशिवाय घनकचरा व्यवस्थापन वापरकर्ता शुल्क वसूल करण्याचेही प्रस्तावित करण्यात आले. तथापि एका बाजूला आर्थिक आघाडीवर कठोर उपाय योजावे लागणार असले तरी दुसऱ्या बाजूने मुंबईकरांच्या वाहतुकीच्या दृष्टीने 'बेस्ट' प्रशासनाला एक हजार कोटी रुपयांची मदत पालिकेला करावी लागणार आहे. एस. टी. किंवा बेस्ट या एकेकाळी आर्थिक स्वयंपूर्ण असलेल्या सेवा आता परावलंबी झाल्या आहेत. हे चित्र बदलण्याची शक्यता नाही. महाराष्ट्रातीलच नव्हे देशातील अन्य महानगरपालिकांचा विचार करता मुंबई महानगरपालिकेचा कारभार एका निश्चित चौकटीत चालतो. भूगोलाच्या मर्यादांमुळे अवघडलेल्या मुंबई शहराचा आकार-उकार लक्षात घेता, मुंबई महानगरपालिकेकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधा खरोखरच वाखाणण्याजोग्या आहेत. पालिकेकडून उभारण्यात आलेला किनारी मार्ग (कोस्टल रोड) हा पूर्णपणे नवीन रस्ता हे मुंबई महानगरपालिकेचे मोठे यश मानावे लागेल. गोरगरिबांना मोफत उपचार मिळावेत यासाठी महापालिकेकडून चालवली जाणारी इस्पितळे हीदेखील अभिमान बाळगावी अशी बाब. असे प्रचंड क्षमता असलेले हे शहर त्याचे हात-पाय बांधून ठेवलेले असल्याने पळू शकत नाही ही बाब क्लेशकारक. राजकीय पक्षांनी मुंबईला बटीक म्हणूनच वागवले. दिल्लीकरांचा प्रयत्न मुंबईची मालकी त्यांच्याकडे कशी खेचता येईल हा आणि मुंबईकरांचा ते प्रयत्न कसे हाणून पाडता येतील हा. या साठमारीत हे शहर दुर्लक्षितच राहते. वास्तविक न्यू यॉर्क, लंडन वा तत्सम शहरांशी बरोबरी करण्याची क्षमता असलेले हे शहर प्रशासकीय दौर्बल्य आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यामुळे आपली अपेक्षित उंची गाठू शकत नाही, हे वास्तव आहे. मुंबईकरांचे हे प्राक्तन किती काळ असेच राहणार हा प्रश्नच आहे.

# दोन महिने लोटले तरी कृष्णा आंधळे फरार, आकासह त्याच्या सहकाऱ्यांची नार्को टेस्ट करा-आ.धस



बीड, (प्रतिनिधी):-आका आणि त्यांच्या गँगचा माज अजून संपलेला नाही. अशोक मोहिते प्रकरणातील आरोपी हे कृष्णा आंधारेचे मित्र आहेत. आका आणि त्याच्या सहकाऱ्यांची नार्को टेस्ट करा अशी मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी केली आहे. आमदार धस पुढे बोलताना म्हणाले की, दोन महिने झाले तरी कृष्णा आंधळे फरार आहे. तर अशोक मोहितेच्या प्रकरणामध्ये जे आरोपी आहेत ते कर्नाटकमध्ये पकडले आहेत. मी अजूनही तेच म्हणतोय की आका आणि त्यांच्या गँगचा माज अजून संपलेला नाही. सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले की, अशोक मोहिते नावाचा मुलाची तब्बेत नाजूक आहे. त्यामुळे आरोपींवर ३०७ चा गुन्हा दाखल करावा म्हणजे हे आतमध्ये जातील. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याला आपल्या कुटुंबाप्रती कोणतीही आस्था नाही. तो करुन करुन काय करणार? कारण त्याचा इतिहासच तसा आहे. त्याला कुणाविषयीही प्रेम नाही. तो निघाला की कुठेही एकटाच निघतो. तसा तो गेलेला आहे. पण जाऊन जाऊन कुठे जाणार? पोलिस व सीआयडी तपासाच्या बाहेर तो जाऊच शकत नाही. मुळात या प्रकरणातील पुरावे विष्णू चाटे व आकाने नष्ट केल्याची भीती आहे. सुरेश धस म्हणाले की, धनंजय देशमुख यांचा त्रागा रास्त आहे. मी त्यांच्या व महादेव मुंडे यांच्या कुटुंबासोबत आहे. माझे डीवायएसपींशी बोलणे झाले आहे. त्यांनी तपास सुरू असल्याचे सांगितले. याशिवाय एसपींनी त्यांना एलसीबीचेही काही सहकारी तपासासाठी दिलेत. महादेव मुंडे यांच्या मारेकरीही लवकर सापडले पाहिजेत. त्याच्या मुलाच्या डोळ्यातील पाणी पाहून माझा प्रचंड संताप होत आहे. त्यामुळे त्याला न्याय मिळणे गरजेचे आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड संदर्भातील बातम्यांचे व्हिडिओ का पाहतो? या रागातून अशोक मोहिते यांना मारहाण झाल्याची घटना घडली होती. या घटनेत अशोक मोहिते हे गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणातील आरोपींना ताब्यात घेण्यात धारूर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील मारहाण करणारे वैजनाथ बांगर आणि अभिषेक सानप या दोघांना धारूर पोलिसांनी कर्नाटक येथून अटक केली आहे.

# तुम्हाला मुलाला निवडून आणता आलं नाही

## अजित पवारांचा राज ठाकरेंना टोला

मुंबई, (वृत्तसेवा) :- राज्यातील विधानसभा निवडणुकांवरील निकालावरुन अद्यापही आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. ईव्हीएमच्या घोळामुळेच महायुतीचा विजय झाल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यातच, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मनसेच्या मेळाव्यात विधानसभा निकालावर भाष्य करताना, लोकांनी आपल्याला मतं दिली पण ती आपल्यापर्यंत पोहोचलीच नाही, असे वक्तव्य केले होते. तसेच, ईव्हीएमच्या घोळामुळेच महायुतीचा विजय झाल्याचेही त्यांनी सूचवले होते. आता, राज ठाकरेंच्या या वक्तव्यावर अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली असून राज ठाकरेंना स्वत:चा मुलगा निवडून आणता आला नाही, त्यांनी आम्हाला सांगू नये, अशा शब्दात पलटवार केला आहे. तर, राहुल गांधींच्या आरोपावरही उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलंय. राहुल गांधी यांनी तपासणीसाठी स्वतःची टीम लावावी, ८ तारखेला दिल्लीचा निकाल आहे, म्हणून त्यांचं रडगाणं सुरु आहे, असे म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी खासदार सुप्रिया सुळेंसह केलेल्या आरोपावर अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली. तसेच, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही काही दिवसांपूर्वी मनसेच्या मेळाव्यातून महायुतीच्या विजयावर प्रश्न उपस्थित केले होते.

# महाराष्ट्रात ५ वर्षात ४४ लाख मतदार वाढले मग ५ महिन्यात ३९ लाख मतदार कसे आले?

## राहुल गांधींचा निवडणूक आयोगाला सवाल



नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- महाराष्ट्राच्या निवडणुकांचा आम्ही अभ्यास केला. या निवडणुकांमध्ये आम्हाला अनियमितता आढळली आहे. कारण महाराष्ट्रात ५ वर्षात ४४ लाख मतदार वाढले मग ५ महिन्यात ३९ लाख मतदार कसे आले? असा सवाल काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणुक आयोगाला केला आहे.यासह आम्हाला लोकसभा आणि विधाससभा निवडणुकीच्या मतदारांची यादी हवीय. नाव, पत्ता आणि फोटोसहीत यादी द्यावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला केली आहे. राहुल गांधी यांची दिल्लीत पत्रकार परिषद पार पडली आहे.या पत्रकार परिषदेला शिवसेना युबीटीचे खासदार संजय राऊत आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. यावेळी राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात पार पडलेल्या निवडणूकीवर भाष्य केले. २०१९ आणि २०२४ या पाच वर्षाच्या काळात आम्हाला ४४ लाख मतदार महाराष्ट्रात वाढले. त्यानंतर लोकसभेची २०२४ ची निवडणूक आणि विधानसभेची २०२४ निवडणूक या काळात आम्हाला ३९ लाख नवीन मतदार वाढले. हिमाचल प्रदेशच्या लोकसंख्येएवढे मतदार वाढले? त्यामुळे हे मतदार कोण आहेत? असा सवाल राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला केला आहे. राहुल गांधी पुढे म्हणाले, आम्हाला लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीची मतदारांची यादी हवीय. नाव, पत्ता आणि फोटोसहीत यादी हवीय. आम्ही याआधी निवडणूक आयोगाकडे मागणी केली होती. पण त्यांनी काहीच उत्तर दिलेले नाही. त्यामुळे काही तरी चुकत असल्याने निवडणुक आयोग आम्हाला उत्तर देत नाही आहे,असा आरोप राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर केला. हिमाचलच्या लोकसंख्येएवढे ३९ लाख मतदार कोण आहेत? आणि कुठून आले? महाराष्ट्रातील युवांची सख्या ९.७ करोड मतदार आहेत, म्हणजे लोकसंख्येपेक्षा जास्त मतदान आहे? काँग्रेसला लोकसभेला कामठी विधानसभा मतदार संघात १.३६ ला मतं मिळाली आहेत, त्यामुळे लोकसभा आम्ही जिंकलो. भाजपला या निवडणुकीत १.१९ लाख मतं मिळाली. पण या मतदार संघात ३५ हजार नवीन मतदार येतात. ३५ हजार मतं भाजपला मिळतात आणि ते जिंकतात. हे एक उदाहरण आहे आणि भाजप निवडणुक जिंकते. अशा घटना शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांच्या मतदार संघात घडल्या आहेत,असे देखील राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाचे लक्ष्य केंद्रीत केले आहे. निवडणूक आयोग सरकारची गुलामगिरी करत आहे, ही ३९ लाख मते कुठे जाणार? आता ते बिहारमध्ये जातील, नंतर यूपीत जातील, हा नवा पॅटर्न झाला आहे, आम्ही लढणारे लोक आहोत, आम्हीच लढणार आहोत, आमचा कसा पराभव झाला हे आम्ही पुढे आणले आहे, निवडणूक आयोगाने घातलेले कफन काढून टाकावे, असे संजय राऊत म्हणाले आहेत.

## पान १ वरून

### वैजनाथ बांगरला...

वार केले होते. मोहिते यात गंभीर जखमी झाला होता. वाल्मिक कराड, मुंडे साहेबांच्या बातम्या बघितल्या तर तुझा संतोष देशमुख करून टाकू असे म्हणत अशोकच्या डोक्यात वैजनाथने कोयता घातला होता. गंभीर जखमी झालेल्या अशोकचे स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र त्याला नंतर लातूरच्य रुग्णालयात हलवण्यात आले. अशोकच्या डोक्याला आठ टाके पडले आहेत.

### लाडकी बहीण...

योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेतील लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये थेट खात्यात दिले जात होते. आतापर्यंत योजनेचे सात हप्ते वितरीत करण्यात आले आहेत. फेब्रुवारी महिन्याचा हप्ता लवकरच देण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकांआधी जाहीर केलेल्या अनेक योजनांचा मोठा आर्थिक ताण शासकीय तिजोरीवर येत असल्याची ओरड होत होती. यासाठी इतर योजनांचा निधी कमी केला असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. तसेच अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर शिवभोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या दोन योजना बंद करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती.

### बस्ता बांधण्यासाठी...

निघाले होते. मात्र सकाळी आठच्या सुमारास ते केज-बीड रोडवरील सांगवी पाटी जवळ गेले असता पुलाच्या पुढील वळणावर जीपचा आणि अन्य एका वाहनाचा अपघात झाला. आणि यामध्ये मुलीचे वडील आणि शिक्षक श्रीराम घुले यांच्या पत्नी उर्मिला घुले यांचे अपघाती निधन झाले.

### राखेच्या अवैध...

असायला हवा नसता संबधितावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही याप्रसंगी श्रीमती मुंडे यांनी सांगितले. या बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत,निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. श्रीमती मुंडे यांना पावर पॉइंट प्रेझेंटेशन व्दारे माहिती देण्यात आली बैठकीचे प्रास्ताविक व आभार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मानले.

### खरेदी केंद्र बंद...

देऊन शासकीय खरेदी केंद्र बंद करण्यात आले आहेत.सोयाबीन हमीभावाने पूर्ण खरेदी सरकरने करावी यासाठी पुन्हा रस्त्यावर उतरून लढाई करावी लागणारी आहे अशी खंत किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांनी व्यक्त केली आहे. सत्तेत आलेल्या महायुतीच्या सरकारने निवडणुकीत सोयाबीनला ६ हजार रुपयांचा हमीभाव असे आश्वासन दिले होते. त्यानंतर राज्यसरकारने प्रतिक्विंटल ६,९४५ रु हमीभाव शिफारस केलेली असताना केंद्रसरकारकडून ४,८९२ रु हमीभाव जाहीर केला होता परंतु शासकीय खरेदी केंद्रावर शेतमाल विकलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा हमाली-काढता-बारदाना या नावाखाली प्रतिक्विंटल १५० ते २०० रुपयाला शेतकऱ्यांचा खिसा मारून, जाहीर केलेला हमीभाव सुद्धा न देण्याचे पाप या सरकारने केले असून आणि आत्ता तर थेट शासकीय खरेदी केंद्र बंद तारखेचा दाखला देत बंद करण्यात आली आहेत. काल पर्यंत रस्त्याच्या रांगेत उभ्या असलेल्या सोयाबीनचा हमीभावानुसार ४,८९२ प्रतिक्विंटल असलेला भाव आत्ता खाजगी व्यापाऱ्याकडे ३,८०० रु सुद्धा मुश्किलीने विकावा लागत आहे. अन्यथा वर्षभर सोयाबीन घरात सांभाळावी लागेल. अशाप्रकारे शेतकऱ्यांना चिमटीत पकडून आत्मनिर्भरतेची दवंडी सरकार वाजवत आहे. भारतामध्ये तेलबियांची गरज खूप मोठी आहे. देशातील वाढती लोकसंख्या आणि लोकांच्या बदलत्या आहारामुळे तेलबियांच्या मागणीत वाढ झाली आहे. देशात दरवर्षी सुमारे ३५० लाख टन तेलबियांची आवश्यकता असते.भारतातील तेलबियांचे उत्पादन गरजेपेक्षा कमी असल्याने, मोठ्या प्रमाणात तेलबियांची आयात करावी लागते. आपली आयात गुणवत्ता ६०% ते ६५% इतकी आहे.तेलबियांच्या आयातीमुळे दरवर्षी सुमारे ७० ते ८० हजार कोटी रुपये तेलबियांच्या आयातीवर खर्च होतात.हे अवलंबित्व कमी करण्यासाठी आत्मनिर्भरतेचे पोकळ प्लॅन बनवले जातात, पण योग्य अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे वेळोवेळी आयात वाढत जात असताना आपल्याच देशातील शेतकऱ्यांचा माल तारखांच्या आकडेवारीवरून खरेदी करण्याचे थांबवणे म्हणजे आरोपीला न्यायालयाने तारखाच्या कचाट्यात अडकाव त्याचप्रमाणे हे सरकार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी वागत आहे.त्यामुळं सोयाबीन पिकवणे गुन्हा आहे कि काय असे भासू लागले आहे. वेळोवेळी, या प्रश्नांची उकल करून निवेदन- चर्चा करून देखील जर सरकार त्याच चालीवर राहणार असेल तर शेतकरी भावा-बहिणींनो कायदे आणि धोरण ठरवणाऱ्या, खुर्च्या आपल्याशी सावत्र वागत असतील तर आत्ता आपल्याला रस्त्यावर यावं लागेल. आणि आपण पिकवलेल्या माल हमीभावानेच खरेदी करण्यासाठी या सरकारला भाग पाडावे लागेल.हा एकच मार्ग सरकारने आपल्यासमोर ठेवला आहे. आज सोयाबीन उत्पादक शेतकरी जात्यात आहे परंतू इतर सगळे शेतकरी सुपात आहेत हीच वेळ उद्या कापूस हरभरा तूर या सर्वच शेतकऱ्यांवर येऊ नये म्हणून या सरकारची कोंडी करण्यासाठी सर्व शेतकरी, शेतकरीपुत्रांनो कंबर कसून लढण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन अखिल भारतीय किसान सभा बीड जिल्हा कमिटी करत आहे.

### बीड एमआयडीसासी...

वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बीड येथील शासकीय विश्रामगृहात बैठक घेत चर्चा केली. जमिन पाहणी करण्यात आली असल्याचे सांगत याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, यांच्याकडे रीतसर पत्रव्यवहार केला आहेङ्गबीड येथील एमआयडीसी संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित केलेल्या या बैठकीला एमआयडीसी विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी सोनाली मुळे, प्रादेशिक अधिकारी अधिकारी अमित भामरे व अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थित होते. बैठकीत बीड शहरातील एमआयडीसीचा विकास याबाबत व्यापक चर्चा करण्यात आली. ही बैठक सकारात्मक ठरली. दरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी या संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. बीड एमआयडीसीचा विकास व्हावा या ठिकाणी मोठे उद्योग यावेत, यातून रोजगार निर्मिती व्हावी यासंदर्भात चर्चा करण्यात आली होती. एमआयडीसीसाठी जमिनीची पाहणी देखील झाली असून यापुढील काळात बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होईल अशी भावना व्यक्त करण्यात आली.

### दोन तरूणांची...

(रा. कृष्णा नगर, परळी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ऑक्टोबर २०२३ मध्ये अनंत ढोपरे याने निसर्ग याला सांगितले की, धिरज बद्रीनारायण बाहेती (रा. परळी) यास परळी तालुक्यातील मौजे रेवली येथे 'शाहू फुले आंबेडकर' नावाने शाळा मंजूर झाली आहे. तिथे माझे क्लर्क म्हणून काम होत असून शिपाई पदासाठी जागा रिक्त आहे. मात्र, त्यासाठी १२ लाख रुपये भरावे लागतील, त्यापैकी ६ लाख रुपये लगेच आणि उर्वरित ऑर्डर आल्यानंतर भरावे लागतील. या माहितीनंतर निसर्ग आणि त्याच्या वडिलांनी विकासराव डुबे यांच्यासह धिरज बद्रीनारायण बाहेती याची भेट घेऊन खातरजमा केली. बाहेतीने ही ऑफर खरी असल्याचा दावा केला आणि त्याच्या पत्नी दिपा बाहेती व उमेश तपके यांच्याशी संपर्कात राहण्यास सांगितले. नोकरीच्या आशेने निसर्गच्या वडिलांनी तब्बल ८ लाखांना एक एकर शेती विकली आणि २ ऑक्टोबर २०२३ रोजी मोंढा मार्केटमधील 'बाहेती ऑफसेट' येथे जाऊन ६ लाख रुपये रोख स्वरूपात दिले. यावेळी धिरज बाहेती, दिपा बाहेती आणि उमेश तपके हे उपस्थित होते. पैसे घेताना बाहेतीने काम न झाल्यास बँकेच्या व्याजाप्रमाणे रक्कम परत करण्याचे आश्वासन दिले. ठरलेल्या प्रमाणे १५ जून २०२४ रोजी निसर्ग आणि अनंत यांनी उमेश तपके यांना भेटून जॉइनिंग ऑर्डरची विचारणा केली. मात्र, धिरज बाहेती आणि दिपा बाहेती परळी सोडून फरार झाले असल्याची माहिती मिळाली. जुलै २०२४ मध्ये धिरज बाहेतीने संपर्क साधून तुम्ही हायपर होऊ नका, लवकरच पैसे देतो असे सांगितले. मात्र, त्यानंतर त्याचा संपर्कच तुटला. पीडितांनी पोलिसांकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला असता, दिपा बाहेती हिने फोन करून एक महिना थांबा असे सांगितले. मात्र, अद्याप रक्कम परत करण्यात आलेली नाही. त्यामुळे मला शिपाई म्हणून तर अनंत ढोपरे यास क्लार्क म्हणून नोकरी लावण्यासाठी प्रत्येकी सहा लाख घेऊन एकूण १२ लाखांची फसवणूक झाल्याची तक्रार निसर्ग जमशेटटे यांनी परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात दिली. त्यांच्या तक्रारीवरून धिरज आणि दीपा बाहेती या दोघांवर फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# रुग्णसेवेच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करा

## डॉ.अशोक थोरात यांचे प्रतिपादन ; माऊली नर्सिंग महाविद्यालयात शपथग्रहण सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

आज तुम्ही सर्वजण रुग्णसेवेची शपथ ग्रहण करत आहात. पुढे चालून या क्षेत्रातील सेवेतून आपली वेगळी ओळख निर्माण करावी असे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी केले. बीड शहरातील धानोरा रोडवरील माऊली नर्सिंग कॉलेजमध्ये आयोजीत शपथग्रहण सोहळ्यात ते बोलत होते. माऊली नर्सिंग महाविद्यालयात विद्यार्थीनींच्या शपथग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.



अशोक थोरात, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, काँग्रेस नेते रविंद्र दळवी, राष्ट्रवादीचे नेते कल्याण आखाडे, मेट्रन रमा गिरी, इंजि.रविंद्र तोंडे, पोलिस निरीक्षक खेडकर, डॉ.अनिल सानप, डॉ.सचिन आंधळकर, डॉ.अनंत मुळे, डॉ.चोले, भाजपा नेते अजय सवाई, डॉ.वर्षा तिडके, अनिल चांदणे, भैय्या मोरे, डॉ.लक्ष्मण जाधव, विनोद मुळुक, अनिल राठोड, रणजित बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी फलोरेन्स नाईटींगेल यांचे प्रतिमापुजन व दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव डॉ.महादेव मुंडे यांनी केले.



*बीड ची सौ कांचन जाधव व अभिषेक कसबे यांच्या विवाह प्रसंगी शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र संपादक दत्तात्रेय नरनाळे,अभिषेक गायकवाड, छायाचित्र दिसत आहेत.*

# विद्यार्थ्यांमध्ये यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास पाहिजे

## विवेकानंद शाळेच्या निरोप समारंभ कार्यक्रमात प्रा.डॉ.पंडीत तुपे यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील विवेकानंद विद्यालय, धानोरा रोड बीड येथे १० वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जगताप सर होते तर प्रमुख पाहुणे प्रा.श्रीमंत बिराजदार होते या वेळी बोलतांना प्रा.डॉ.पंडीत तुपे यांनी जिवनात यशस्वी होण्यासाठी निश्चत बरोबर आत्मविश्वास



पाहिजे असे यावेळी म्हणाले. प्रा.विकास जाधव, गिरी सर यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी बोलतांना प्रा.डॉ.पंडीत तुपे म्हणाले की १० वी हा जीवनाचा अत्यंत टर्निंग पॉईट आहे. यापुढे करिअरच्या अनेक संधी, शाखा आहेत या नवआधुनिक युगात, पालक व विद्यार्थी गोंधळलेला आहे. यशस्वी होण्यासाठी ध्येय, मार्गदर्शन, मेहनत, सातत्यता, आत्मविश्वास पाहिजे त्यांनी अब्राहम लिंकन अलेक्झांडर यांचे उदाहरण दिले. यावेळी प्रा.श्रीमंत बिराजदार, विकास जाधव यांनी मार्गदर्शन केले. १० वी च्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक यांनी अध्यक्षीय समारोप केला.

# यशस्वी जीवनाचा मुलमंत्र शिक्षण हेच आहे: पो.नि.बंटेवाड

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

देशाला आर्थिक महासत्ता आणि प्रभावी राष्ट्र बनवण्यात युवक महत्वपुर्ण भुमिका बजावू शकतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांना गुणवत्तानुरूप शिक्षण दिले गेलेच पाहिजे. यशस्वी जीवनाचा मुलमंत्र शिक्षण हेच आहे असे प्रतिपादन बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो.नि.शिवाजी बंटेवाड यांनी नवगण राजुरी येथील गजानन विद्यालयात इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी बोलतांना केले. गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.केशव भांगे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पो.नि.शिवाजी बंटेवाड हे होते. यावेळी पुढे बोलतांना पो.नि.बंटेवाड म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तीमत्वाचा



पाया शाळेतच रचला जातो. शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कार, मुल्यांच्या आधारावरच पुढील शिक्षणातील यश अवलंबून असते. शाळेत मिळणार्या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असल्याने शालेय शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. तुमच्यातील जे काही सर्वोत्तम आहे ते प्रकट करणे म्हणजे खरे शिक्षण आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे. त्याला शाळेत पाठवणे हे पालकांचे कर्तव्य आहे, उध्दीष्ट साध्य करायचे असेल तर संयम, चिकाटी हे महत्वाचे माध्यम आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलतांना प्राचार्य केशव भांगे म्हणाले की, देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाची महत्वाची भुमिका लक्षात घेऊन शिक्षण विषयक कार्यक्रम राबविले जातात. मानवी जीवनाचा सर्वांगिण विकास हा त्याच्या शिक्षणावरच अवलंबून असतो. तो जितका शिक्षणामध्ये ज्ञान अर्जित करतो तो तितकाच यशाच्या शिखरावर जावून बसतो. शिक्षणाची दिशा ही माणसाच्या संपूर्ण विकासासाठी आणि त्याच्या मुलभूत अधिकारासाठी महत्वाची असते, आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने चांगले विचार आत्मसात करावेत. आपले उध्दीष्ट साध्य करावे असे सांगून इयत्ता १० व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

# आय एस ओ मानांकित प्रा. शाळा नफरवाडीची शैक्षणिक सहल संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील नफरवाडी गावच्या आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शाळेची शैक्षणिक सहल नुकतीच संपन्न झाली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांना शालेय पुस्तकी अनुभवाबरोबरच प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी, महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा असणाऱ्या वास्तू, नैसर्गिक ठिकाणे याबद्दलची प्रत्यक्ष माहिती मिळवण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असणारे शाळेचे मुख्याध्यापक आण्णासाहेब खंडागळे सरांच्या तसेच जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी बोंदार्डे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व स्टाफच्या नियोजनाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

सविस्तर माहिती अशी की ही सहल दिनांक २६ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत संपन्न झाली. पाटोदा आगाराची



बस घेण्यात आली होती. यामध्ये बसचालक प्रकाश सानप यांच्या सहकार्याने उत्तम प्रवास झाला. शैक्षणिक सहल यशस्वी करण्यासाठी नफरवाडी शाळेचे मु.अ.श्री. खंडागळे सर,नफरवाडी शाळेतील जेष्ठ व अनुभवी शिक्षक मुरूमकर सर,श्री राऊत सर,श्रीम. काकडे मॅडम,श्रीम.कदम मॅडम,श्रीम.,श्रीम वावरे मॅडम आदींनी परिश्रम घेतले. नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या या शाळेचे मुख्याध्यापक आण्णासाहेब खंडागळे सर व सर्व नफरवाडी शिक्षकवृंद यांचे नफरवाडी शा.व्य.समिती अध्यक्ष उत्तरेश्वर औटे, उपाध्यक्ष ,सर्व सदस्य तसेच गावचे सरपंच विद्याताई सवासे, उपसरपंच शितलताई तांबे, ग्रा.पं सदस्य आणि पाटोदा गटशिक्षणाधिकारी पिकवणे साहेब, जेष्ठ शिक्षणविस्ताराधिकारी बोंदार्डे साहेब यांनी तोंडभरून कौतुक केले आहे.

## माता रमाई यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

डॉ बी आर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड व भारतीय धम्म महासंघ, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाई यांची १२७ वी जयंती डॉ बी आर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड येथे मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. प्रसंगी माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमे समोर मेमबत्ती अगरबत्ती प्रज्वलित करून व पुष्प आणि पुष्पहार अर्पण करून आयु खरात बी एस आणि आयु डी के जाधव यांनी विनम्र अभिवादन केले. आयु अंकुश चव्हाण यांनी सामुहिक वंदना घेतली. जयंतीच्या अनुषंगाने आयु बी एस खरात, बी आर गायकवाड, एस एम जोगदंड आणि अंकुश चव्हाण यांनी माता रमाई यांच्या कार्यकर्तूत्वा विषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे शेवटी सामुहिक सरणत्तय होवून आयु सूरेश कांबळे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले. जयंती दिनानिमित्त डी के जाधव , यांनी उपस्थित राहून विनम्र अभिवादन केले.


## जाहीर प्रगटन

अ‍ॅड. महाजन सजोत एस.

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २३९ / २०२५

अर्जदार– १. रुक्मीनबाई सुरेश शेनकुडे वि. निरंक

रुक्मीनबाई भ्र. सुरेश शेनकुडे, वय – ६६ वर्षे, धंदा – घरकाम, रा. विप्र नगर, ब्राम्हणवाडी, बीड ता. जि. बीड

प्रकाश पि. सुरेशराव शेनकुडे, वय – ५० वर्षे, धंदा – व्यापार, रा. सदर राजेश पि. सुरेशराव शेनकुडे, वय– ४८वर्षे, धंदा – व्यापार, रा. सदर

गैरअर्जदार – निरंक

**प्रकरण: भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत **सुरेश पि. आसराजी शेनकुडे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **सुरेश पि.आसराजी शेनकुडे हे दिनांक २१/०२/२०२० रोजी विप्र नगर, ब्राम्हणवाडी, बीड, ता.जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. त्यांचे शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे **सुरेश पि.आसराजी शेनकुडे** या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे सुरेश पि. आसराजी शेनकुडे रा. विप्र नगर, ब्राम्हणवाडी, बीड, ता.जि.बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख** ०१/०४/२०२५.आज दिनांक ०५/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात तथा जाहीर करण्यात येते की, र. डी. जि. प. बीड सब डि.व पं. स. ता.बीड पैकी मौजे घाटजवळा, ता. जि. बीड येथील शेतजमीन गट नं. २१, क्षेत्र ०२ हे. ६९ आर पूर्ण, ज्याच्या चतु: सिमा खालील प्रमाणे आहेत.

**पूर्व : वलीपूर – मैंदा शीव**
**पश्चिम : गाडी रस्ता**
**दक्षिण : श्री. राजेभाऊ बिटे व श्री. पांडुरंग बिटे यांची जमीन**
**उत्तर: द्वारकादाबाई दादाराव घुमरे यांची जमीन**

याप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यामधील अनुवंशीक अधिकारासह कायम खरेदी घेण्याचा करार आमचे आशिल मंदा गणेश शिंदे रा.मन्यारवाडी ता.जि.बीड यांनी या मिळकतीचे मालक श्री. हनुमंत नामदेव वरवडे व सौ. जनाबाई हनुमंत वरवडे, दोघे रा. पाटील गल्ली, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड, यांचेशी केलेला आहे. आणि व्यवहार पूर्ण करण्याचे कामी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण न झाल्यास माझे अशिल सदरची मिळकत कायमस्वरूपी खरेदी करणार आहेत. सदरची मिळकत ही विनाबोजा, विनातारण अथवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नाही व सदरील मिळकतीचा वाद नसल्याची खात्री विद्यमान मिळकत मालकांनी दिलेली आहे.

तरी वरील मिळकतीबद्दल कोणालाही खरेदी, गहाण, बक्षीस, मृत्युपत्र, अदलाबदल व इतर त्या प्रकारच्या आर्थिक स्वरूपाचा बोजा, वहिवाटी, कोर्ट डिक्री आधारे इत्यादी कोणत्याही प्रकारचे (स्थावर मिळकती संबंधी) कोणतेही हक्क अथवा अधिकार असल्यास त्याची लेखी नोंद संबंधित कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह ही जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाचे आत करावी. नसता वरील मिळकतीबद्दल कोणालाही कोणत्याही प्रकारचे ( सुप्त देखील) अधिकार नाही आणि माझ्या अशिलाच्या व्यवहार करण्यास आक्षेप नाही, असे समजून व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर कोणाचाही अधिकार असणार नाही, यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

बीड
दिनांक : ०८-०२-२०२५

**जाहीर प्रगटन देणार मार्फत**
**अ‍ॅड. बी. के. गायकवाड,**
**जिल्हा न्यायालय, बीड, मो.नं. ९६८९४९७६७९**


# रथसप्तमी - सूर्यनमस्काराचे योगावलोकन





स्पर्धेचे आयोजन करून भारत सरकारच्या योग धोरणाला पुढे नेण्याचे काम केले. स्वतः आरोग्य अधिकारी व कर्मचारी योगा बद्दल संवेदनशील असल्याचे दिसून आले. यावरून लक्षात येते की आता आरोग्यासाठी नुसते होमिओपॅथी , ॲलोपॅथी वर अवलंबून न राहता योगाच्या माध्यमातून शरीराला निरोगी ठेवणे अगत्याचे झाले आहे. त्यानंतर आणखी एक कार्यक्रम जालना जिल्ह्यात परतुर तालुक्यात पार पडला या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असे की येथे लायन्स क्लब नावाचा समूह अतिशय उत्साह पूर्ण योग उपक्रम नित्य क्रमाने चालवतो त्यामध्ये अनेक सेवानिवृत्त सदस्य आणि महिला मंडळ तेवढ्याच उत्साहाने सहभाग घेतात हे पाहून मला आश्चर्य वाटले.मला तिथे जाण्याचा व सन्माननीय अतिथी म्हणून मार्गदर्शन करण्याची संधी दिली त्याबद्दल लायन्स क्लब चे मनापासून धन्यवाद. या सर्व घडामोडींमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की महिलांचे प्रमाण योग क्षेत्रामध्ये प्रचंड प्रमाणात वाढत आहे जी अतिशय स्तुत्य बाब आहे याचे कारण आजच्या काळामध्ये स्त्री सर्व क्षेत्रांमध्ये आपले कर्तृत्व धडाडीने करून दाखवत आहे.

ते म्हणतात ना

*अपने कर्तव्य संग नारी भर रही है अब उडान,*
*नाही कोई शिकायत ना कोई थकान,*
*यही है नारी की असली पहचान.....*

मात्र आर्थिक सक्षमीकरणा बरोबरच मानसिक तसेच शारीरिक सशक्त असणे आवश्यक आहे, म्हणून अजून जास्त प्रकर्षाने महिलांनी योग, व्यायाम व सकस आहार या माध्यमातून स्वतःला सुदृढ ठेवणे देखील गरजेचे आहे. कारण कुठलेही ध्येय साध्य करायचे असेल तर निरोगी आरोग्य ही प्रथम गरज आहे तेव्हा आपण आपली संपूर्ण क्षमता वापरून ते साध्य करू शकतो. नुसत्या सूर्यनमस्काराची शक्ती पहायची असेल तर युवकांनी(सर्वांनी) दैनंदिन जीवनात २१ सूर्यनमस्कार करून येत्या काही दिवसांत स्वतःच्या आयुष्यात झालेले बदल पाहू शकतात म्हणजे एवढी ताकद फक्त सूर्यनमस्कारात आहे. दरवर्षी रथसप्तमी असो किंवा जागतिक योग दिन असो हा वाढत जाणारा प्रतिसाद पाहून लवकरच भारत योग धोरण साध्य करून निरोगी,सशक्त व सक्षम भारत बनेल यात शंका नाही.

४ फेब्रुवारी रोजी संपूर्ण भारत भरामध्ये रथसप्तमी दिवस उत्साहात पार पडला. रथसप्तमी म्हणजे आपल्या पुराणांमध्ये सूर्याचा जन्म दिवस झाला असे मानले जाते. ज्याप्रमाणे सूर्य नित्य क्रमाने स्वतः धगधगतो मात्र इतरांना प्रकाश पुरवतो त्याचप्रमाणे आपण देखील आपल्या कर्माने निराधारांना वंचितांना जे आजपर्यंत अंधकारमय जीवन जगतात त्यांच्या आयुष्यामध्ये प्रकाश पेटवला पाहिजे असा तो संदेश असला पाहिजे असे मला वाटते. रथसप्तमीच्या या पावन मुहूर्तावर राज्यभरामध्ये जागतिक सूर्यनमस्कार स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यापैकी दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या अंबड तालुक्यामध्ये यावर्षी देखील राज्य सूर्यनमस्कार स्पर्धा पार पडल्या, त्यामध्ये गेली तीन वर्षे झाली मला योग प्रशिक्षक म्हणून सहभागी होण्याची संधी मिळाली याचा मनस्वी खूप आनंद आहे, अंबडच्या या उपक्रमातून प्रेरणा घेत आम्ही बीड जिल्ह्यात हा कार्यक्रम आयोजित केला त्यामध्ये अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला व तब्बल दीड हजार योग प्रेमी या कार्यक्रमात सहभागी झाले त्यामध्ये लहानांपासून ते वृद्धापर्यंत सर्वांनी सहभाग घेतला जिल्हा क्रीडा प्रशासनाने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत जिल्हा क्रीडांगण सूर्यनमस्कार स्पर्धे साठी उपलब्ध करून दिले त्याबद्दल प्रशासनाचे देखील खूप आभार. २६ जानेवारी दिवशी प्राथमिक आरोग्य केंद्र चराटा येथे सर्व कर्मचारी यांनी योग, प्राणायाम, मेडीटेशन केले. जिल्हा आरोग्य कार्यालय मध्ये देखील सर्व अधिकारी आणि कर्मचारी महोदयांनी स्फुर्तपणे सूर्यनमस्कार

**(आंतरराष्ट्रीय योग खेळाडू ,योग प्रशिक्षक, संचालिका राधिका ॲडव्हान्स योगा सेंटर, श्रीमती डॉ. राधा सचिन तांबे) बीड**

# आत्महत्या केली की सुटका होते का ?

संत तुकाराम महाराज याचे ११ वे वंशज हरी भक्त परायण शिरीष महाराज मोरे यांनी केलेल्या आत्महत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. याआधी भय्यूजी महाराज यांनीसुद्धा अशाच प्रकारे मृत्यूला कवटाळले होते. ज्यांना अध्यात्म कळले आहे, ज्यांना प्रारब्ध आणि क्रियमाण कळले आहे, ज्यांना कर्मफळ न्याय कळला आहे, जे इतरांना अध्यात्मिक उपदेश देतात अशा विभूतींनी आत्महत्येसारखा मार्ग स्वीकारणे मनाला रुचत नाही. प्रतिदिन वृत्तपत्रांतून कितीतरी आत्महत्येच्या घटना वाचण्यात येतात. अगदी आठ नऊ वर्षांच्या बालकापासून ते ८०-९० वर्षांच्या वृद्धांपर्यंत लोक मनाविरुद्ध घडले, संकटावर मात करण्याची इच्छाशक्ती संपली आत्महत्येसारखा मार्ग स्वीकारतात. मागील २-३ वर्षांत सुप्रसिद्ध अभिनेता सुशांतसिंग राजपूत आणि अनेक गाजलेल्या चित्रपटांचे आणि मालिकांचे कला दिग्दर्शन करणारे देसाई यांच्या आत्महत्या विशेष गाजल्या. याआधीही चित्रपट क्षेत्रातील अनेक निर्माता, दिग्दर्शक, अभिनेते आणि अभिनेत्रींनीं वेगवेगळ्या कारणांमुळे आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली आहे. आजमितीला असे एकही क्षेत्र नाही जिथे आत्महत्या होत नाहीत. अध्यात्मशास्त्रानुसार ८४ लक्ष योनींचा फेरा पूर्ण झाल्यानंतर मनुष्यजन्म मिळतो. असा अनमोल जन्म सहजपणे संपवणे योग्य आहे का ?

एका सर्वेक्षणानुसार देशातील १३ टक्के तरुण कोणत्या ना कोणत्या तणावामुळे ग्रस्त असतात. जगभरातील तरुणांच्या आत्महत्यांपैकी १० टक्के आत्महत्या केवळ भारतात होतात. हा आकडा दोन लाखांच्या घरात असतो, त्यातील एक लाख हे १५ ते ३५ वयोगटांतील असतात, नॅशनल क्राईम ब्युरोच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत आत्महत्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या, प्रेमात अपयश आल्याने तरुणांची आत्महत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त झाल्याने रुग्णाची आत्महत्या, नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळाल्याने नोकरदारांची आत्महत्या, व्यवसायात कर्जबाजारी झाल्यामुळे व्यावसायिकाची आत्महत्या, कामाचा ताण सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांची आत्महत्या, यांसारख्या घटनांचे सध्या पीक आले आहे. आलेल्या संकटाचा सामना करण्याची उमेदच संपून गेल्यामुळे मनुष्य आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. ऐन उमेदीच्या काळात आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेण्यामागे अनेक भौतिक आणि मानसिक करणे असू शकतात. मात्र आज हा टोकाचा निर्णय घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यामागे कुठेतरी आपणच कारणीभूत आहोत याचाही विचार आत्महत्या करणाऱ्याने करायला नको का ? परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही किंवा परीक्षेत कॉपी करताना पकडले यांसारख्या क्षुल्लक कारणांमुळे विद्यार्थी आत्महत्या करतात. पालकांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, आपल्यामुळे आपल्या पालकांना खाली मान घालावी लागेल या विचाराने विद्यार्थी आपली जीवनयात्रा संपवतात; मात्र आपल्या अशा जाण्याने पालकांना आयुष्यभराचे दुःख आपण देऊन जात आहोत याचा विचार हे विद्यार्थी केव्हा करणार ? मुलांच्या भविष्यासाठी त्यांनी सुंदर सुंदर स्वप्न पाहिलेली असतात, क्षणात या साऱ्या स्वप्नांचा चुराडा होतो. प्रेमात अपयश आल्याने ऐन तारुण्यात तरुण तरुणी आत्महत्येचा निर्णय घेतात; मात्र हे करताना त्यांच्या आई वडिलांनी त्यांच्यासाठी आजतागायत किती काय केले आहे याचा विचार ते केव्हा करणार. अपेक्षित जोडीदार मिळणे हेच जीवनाचे ध्येय असते का ? आपल्याला लहानाचे मोठे करण्यात आपल्या पालकांनी घेतलेले परिश्रम, त्यांनी आपल्याला लावलेली निरपेक्ष माया अशी क्षणात संपवून टाकायची असते का ? नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळते, इतरांची प्रगती होते मात्र आपल्याला डावलले जाते, वरिष्ठ अधिकारी आपल्याला घालून पाडून बोलतात, आपल्यावर कामाचा ताण टाकतात ही कारणे जीवनयात्रा संपवण्यासाठी कारणीभूत कशी काय असू शकतात. प्रयत्न केल्यावर, इतरांची मदत घेतल्यावर या सर्वांवर उपाय खरंच सापडणार नाहीत का ? शेवटी प्रत्येकाचे नशीब हे वेगवेगळेच असते. व्यवसायात कर्जबाजारी झाल्याने काही जण टोकाचा निर्णय घेतात; मात्र आपल्या आत्महत्या करण्यामुळे कर्जाची परतफेड होणार आहे का ? आत्महत्या केल्याने तुमची मुक्तता होईल मात्र तुमच्या घरच्यांनी काय अपराध केला आहे ? काहीजण याही पुढे जाऊन आपल्या मागे घरच्यांना त्रास नको म्हणून मुला बाळांना संपवून स्वतः आत्महत्या करतात. ज्या निष्पाप जीवांचे या सुंदर दुनियेत नुकतेच आगमन झाले आहे त्यांना संपवण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला ? त्यांना मारताना आपल्या काळजाला भेगा कशा पडत नाहीत ?आपल्या कृत्यात त्या निष्पापांचा अपराध तो काय ?दुर्धरआजाराने कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांनी हे भोग आपल्याच पदरी का पडले आहेत, आपली कर्मे या सर्वाला कारणीभूत आहेत का ? दुर्धर आजाराने ग्रस्त सर्वच जण आत्महत्या करतात का, हा विचार कधी केला आहे का ? कोणत्याही संकटावर आत्महत्या हा उपाय असूच शकत नाही. घरातील एकाच्या आत्महत्येमुळे सारे कुटुंब विस्कळीत होते. आत्महत्या तेच करतात ज्यांचे मन कमकुवत आहे. आत्महत्या हे मानसिक आजाराचे टोकाचे लक्षण आहे. आजमितीला भारतात ज्या प्रमाणात शारिरीक आजाराविषयी जागरूकता आहे त्या तुलनेत कितीतरी पटीने मानसिक आजाराविषयी गैरसमज आहेत. प्रत्येकाला जसा शारीरिक आजार होऊ शकतो तसा जीवनातील प्रसंगानुरूप मानसिक आजारही उद्भवू शकतो, त्यासाठी वेळीच मानसोपचारतज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे असते; मात्र 'मानसोपचार तज्ज्ञाकडे केवळ वेडेच जातात आणि आपल्याला काही वेड लागलेले नाही' असा फार मोठा गैरसमज भारतीयांत पसरला आहे, परिणामी सौम्य स्वरूपात असलेला मानसिक आजार कालांतराने उग्र स्वरूप धारण करतो. आणि त्यातूनच पुढे आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जाऊ शकतात.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# सामान्य नागरीकांची अडवणुक खपवून घेणार नाही नगर परिषदेच्या आढावा बैठकीत आ.विजयसिंह पंडित यांचा इशारा

**गेवराई । प्रतिनिधी**

कोट्यावधी रुपये खर्च करूनही शहरातील नागरीकांना नियमित स्वच्छ पाणी का मिळत नाही ? असा सवाल उपस्थित करून आ.विजयसिंह पंडित यांनी व्यापारी गाळ्यांचे लिलाव, शहरातील अस्वच्छता, बंद पडलेले पथदिवे, मालमत्ता करात केलेली बेसुमार वाढ, अतिक्रमण धारकांच्या हक्काचे पीटीआर, रखडलेला हद्दवाढीचा प्रस्ताव, अनुकंपा तत्वावरील प्रलंबित नियुक्त्या यांसह विविध प्रश्नांवर नगर परिषद प्रशासनाला धारेवर धरले. सध्या पालिकेवर प्रशासक आहे, त्यामुळे कोणाच्याही राजकीय दबावाला बळी पडून सर्वसामान्यांची कामे अडवू नका, सामान्य नागरीकांची अडवणुक खपवून घेणार नाही असा इशारा आ.विजयसिंह पंडित यांनी दिला. नगर परिषदेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी माजी आ.अमरसिंह पंडित, पालिकेचे प्रशासक विक्रम मांडूरगे यांच्यासह कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी शुक्रवार, दि.७ फेब्रुवारी रोजी गेवराई नगर परिषदेची आढावा बैठक घेवून सर्वसामान्यांच्या मुलभूत समस्यांच्या निराकरणासाठी पुढाकार घेतला. या बैठकीत माजी आ.अमरसिंह पंडित यांनी शहरातील विकास कामांचा आढावा घेवून मार्गदर्शन केले. पाणी पुरवठा योजनेसाठी ६६.७८ कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला असतानाही शहरातील नागरीकांना दररोज मुबलक स्वच्छ पाणी का मिळत नाही ? असा सवाल आ.पंडित यांनी उपस्थित केल्यामुळे आजवर विकासाचा गाजावाजा करणाऱ्या तथाकथीत कार्यसम्राटांच्या बोगसगिरीचा पडदाफाश झाला. नागरीकांना दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेले एक्सप्रेस फिडर आणि जलशुध्दीकरण यंत्रणा बसविण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना आ.पंडित यांनी पालिका प्रशासनाला दिल्या. या बैठकीत बचतगटाच्या महिलांना कर्ज रक्कमेचे धनादेश आ.पंडित यांच्याहस्ते वाटप करण्यात आले. संजयनगरसह अतिक्रमण भागातील नागरीकांवर आजवरच्या राज्यकर्त्यांनी केलेल्या अन्यायाचा पाढा उपस्थित तक्रारदांनी या बैठकीत वाचला. कोणताही राजकीय भेदभाव न करता नियमाप्रमाणे पात्र असतील त्यांना तात्काळ हक्काचा पीटीआर देण्याचे निर्देश देताना आ.पंडित यांनी या प्रक्रियेतील दलालांचा बंदोबस्त करण्याची सूचना त्यांनी केली.



**• साडे चारशे टक्के मालमत्ता करात वाढ करणारी गेवराई एकमेव नगर परिषद**

**गेवराई शहरातील नागरीक विशेषत: व्यापाऱ्यांनी निवासी आणि वाणिज्य मालमत्ता करामध्ये झालेल्या वाढी बाबतची तक्रार या बैठकीत केली. व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षांनी गेवराई नगर परिषदेने मालमत्ता करात साडे चारशे टक्के एवढी मोठी करवाढ केल्याची बाब निदर्शनास आणून दिली. या अनुषंगाने आ.पंडित यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता तत्कालीन नगर पालिकेतील पदाधिकाऱ्यांनी ही वाढ केल्यामुळे ती कमी करण्याचे अधिकार प्रशासकांना नसल्याचे सांगितले.**

# नाईक सुभेदार बालाजी इंगळे यांचा सेवापूर्ती सन्मान

## माजी सैनिकांच्या सहवासातून देशप्रेमाची भावना वाढीस लागेल : डॉ हनुमंत सौदागर

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कळंबआंबा येथील भूमिपुत्र बालाजी बब्रूवान इंगळे हे भारतीय सैन्यदलातून नाईक सुभेदार पदावर काम करून २४ व्या वर्षाची सेवा करून सेवानिवृत्त झाले.याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने दि २ रोजी सकाळी मिरवणूक काढून त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर जगन्नाथ कदम, प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर,सरपंच शशिकांत इंगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. गावकऱ्यांच्या वतीने नाईक सुभेदार बालाजी इंगळे यांची गावभर वाजत गाजत मिरवणूक काढली गावकऱ्यांच्या वतीने सहकुटुंब नागरी सत्कार करण्यात आला. मिरवणुकीत भारत माता की जय वंदे मातरम या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी बोलताना डॉ हनुमंत सौदागर म्हणाले, सैनिक देशाच्या सीमेवर रक्षण करतात म्हणून आपण घरात सुरक्षित आहोत. जय जवान जय किसान हाच नारा देशाच्या समृद्धीसाठी महत्त्वाचा आहे. सैनिकांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचा कायम सन्मान झाला पाहिजे. असे मत व्यक्त केले. सत्कारमूर्ती बालाजी इंगळे यांनी यापुढे समाजसेवेसाठी तत्पर राहील असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी माजी सैनिक संघटना विविध पदाधिकारी यांच्या हस्ते हे सेवापूर्ती गौरव निमित्ताने बालाजी इंगळे यांचा सत्कार करण्यात आला.



# महाजन वाडी येथील विद्यार्थ्यांनी घेतले उद्योगाचे धडे

**चौसाळा । प्रतिनिधी**

पुस्तकी ज्ञाना पेक्षा प्रत्यक्ष अनुभवातून मिळवलेले ज्ञान चिरकाल टिकते.जपान मध्ये शालेय वयातच मुलांना उद्योगाचे ज्ञान दिले जाते. याच धर्तीवर जि. प. प्राथ शाळा महाजनवाडी येथे बटाटे व केळी पासून चिप्स बनवण्याचा उपक्रम राबवण्यात आला. महाजनवाडी येथील ७० टक्के शेतकरी बटाट्याचे पीक घेतात त्या मुळे कच्चा माल गावातच उपलब्ध होता.सदरील उपक्रम राबवण्या साठी दत्ता सुरवसे यांनी आपल्या शेतातील २५ किलो बटाटे शाळेस मोफत उपलब्ध करून दिले.तसेच सुरेश आजबे यांनी १० डझन कच्ची केळी उपलब्ध करून दिली. सुरवातीला बटाटे स्वच्छ पाण्याने धुऊन घेतले,त्या नंतर इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थिनी ने खिसनीच्या साहाय्याने बटाट्या पासून चिप्स तयार केले,त्या नंतर स्वच्छ पाण्याने धुऊन चिप्स शिजवून घेतले,नंतर ते वाळऊन घेतले. दुसऱ्या दिवशी हे वाळलेले चिप्स तसेच केळीचे चिप्स तयार करून लगेच तळून घेतले ही सर्व कामे शिक्षकांच्या देखरेखी खाली मुलींनी स्व:त केले व अशा तऱ्हेने कुरकुरीत चिप्स तयार झाले. शाळेतील पहिला नवनिर्मितीचा उपक्रम पार पडला. मुलांना नवनिर्मितीचा आनंद मिळाला. सदरील उपक्रम बीडचे गट शिक्षणाधिकारी समिंदर खान , शि . वि.अ.मधुकर तोडकर साहेब, केंद्रप्रमुख आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शना खाली शाळेतील पदवीधर शिक्षक तुकाराम माळकर यांच्या संकल्पनेतून, मुख्याध्यापक सर्जे राव आंधळे याच्या देखरेखी खाली, तसेच शाळेतील शिक्षक दीपा जाधव मॅडम, कैलास भवर व रामप्रसाद वीर सर यांच्या अथक परिश्रमातून राबवण्यात आला.



# डिजिटल मिडिया परिषदेच्या वडवणी तालुका अध्यक्षपदी ओमप्रकाश साबळे यांची निवड

**वडवणी । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या आदेशानुसार व डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या सुचनेनुसार जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी डिजिटल मिडिया परिषदेच्या वडवणी तालुका अध्यक्ष पदी ओमप्रकाश साबळे यांची निवड केली. वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यालयात सर्व पदाधिकारी व पत्रकार बांधवांचे उपस्थिती मध्ये नुकतेच त्यांना निवडपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर, प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, जेष्ठ पत्रकार सुधाकर पोटभरे, तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे, सचिव महेश सदरे, तालुका उपाध्यक्ष धम्मपाल डावरे, कोषाध्यक्ष वाजेद पठाण,पत्रकार हरी पवार, पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार अतुल जाधव, पत्रकार गीतांजली लव्हाळे, पत्रकार राम चौरे, सह आदींची उपस्थिती होती.




# माजी खासदार स्वर्गीय रामरावजी आवरगावकर साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने अभिवादन



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये माजी खासदार कै. रामरावजी आवरगावकर साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वर्गीय थोर स्वातंत्र्य सेनानी रामरावजी आवरगावकर साहेब यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध होण्यासाठी धारूर सारख्या ठिकाणी महाविद्यालय, महावितरण कार्यालय व राज्य परिवहन महामंडळाचे आगार असावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्याच प्रयत्नांतून या सुविधा सामान्य जनतेसाठी उपलब्ध झाल्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर व महाविद्यलयीन कर्मचारी, विद्यार्थी आदि उपस्थिती होते.

# भडंगवाडीत मनरेगा योजनेत गैरव्यवहाराची तक्रार, चौकशीचे आदेश

**गेवराई । प्रतिनिधी**

मौजे भडंगवाडी (ता. गेवराई) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) वैयक्तिक लाभाच्या योजनासह मनरेगामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी पंचायत समिती गेवराईच्या गटविकास अधिकारी यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत. ग्रामस्थ बाळू तोडेकर यांनी पंचायत समितीकडे दिलेल्या तक्रारीनुसार, शेतकरी विष्णू काशिनाथ धनाडे यांच्या नावे गायगोठा आणि जलसिंचन विहीर या वैयक्तिक लाभाच्या योजनांचे प्रस्ताव परस्पर दाखल करून अनधिकृतरीत्या रक्कम उचलण्यात आली. हा प्रकार उघड होताच ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आणि अधिकृत चौकशीची मागणी केली.

यासंदर्भात पंचायत समितीने उपअभियंता संजीव चोपडे, शाखा अभियंता व्ही. एम. सासवडे, तसेच तांत्रिक सहाय्यक जगताप आणि लोणकर यांना पाच दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, भडंगवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच, ग्रामसेवक आणि ग्राम रोजगार सेवकांना चौकशीदरम्यान सर्व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणातील गैरव्यवहाराचा तपशील समोर आल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मनुस्मृतीमुळे जनता गुलामीत गेली विज्ञानापेक्षा धर्म वरचढ झाल्यास देश रसातळाला जाईल : आनंदराज आंबेडकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

मनुस्मृतीमुळे भारत देशातील जनता बौद्धिक गुलामीत गेली होती आणि आत्ता विज्ञानापेक्षा जर धर्म वरचढ झाल्यास भारत देश रसातळाला जाईल अशी सणसणीत प्रतिक्रिया रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी व्यक्त केली ते निर्भीड पत्रकार संघ शाखा माजलगाव आयोजित मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण सोहळ्या प्रसंगी बोलत होते. निर्भिड पत्रकार संघ माजलगावच्या वतिन मूकनायक दिनाचे औचित्य साधून दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजना केले होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके, उद्धघाटक रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर उपस्थीत होते.



# शिवजन्मोत्सव निमित्त आजपासून माजलगाव येथे श्रीमद् भागवत कथा

## शोभायात्रेत सहभागी होण्याचे बाळू ताकट यांचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगावात शिवजन्मोत्सवा निमित्त आज (शनिवार) दि.८ पासून श्रीमद् भागवत कथेची सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी सकाळी १० वाजता शहरातील हनुमान चौक येथून मंगलनाथ मैदान येथील सभा मंडपापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बाळू ताकट यांनी केले.

शिवजन्मोत्सवा निमित्त यावेळी सामूहिक विवाह सोहळ्यासह यावेळी श्रीमद् भागवत कथा, तिरुपती बालाजी महोत्सव आदी कार्यक्रम पार पडणार असून सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी शिवजयंती पार पडणार आहे. त्याच अनुषंगाने आज (दि.८) शनिवार पासून श्रीमद् भागवत कथेची सुरुवात होणार आहे. कथावाचक सुश्री राधास्वरुपा अनन्यादीदी शर्मा यांच्या मधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा पार पडणार आहे.



# जिल्हा परिषदेच्या शाळांना ईमारत बांधकाम, शाळा दुरुस्ती, वीजपुरवठा, स्वच्छतागृहे या पायाभूत सुविधांसाठी निधी द्या ; ना.पंकजाताई मुंडे यांना निवेदन



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था झाली असुन या शाळांमध्ये शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी निधी देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आज दि.७ शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीच्या निमित्ताने आलेल्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा संपर्क मंत्री बीड जिल्हा ना.पंकजाताई मुंडे यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत त्यांची पुनर्बाधणी आवश्यक आहे तर ४६८ शाळांमधील ८५६ वरवगखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे.तसेच जिल्हा परिषदेच्या ६३ वस्तिशाळांना स्वतःची इमारत नसल्याने किरायाच्या रूममध्ये, पत्र्याच्या शेडमध्ये, झाडाखाली भरविण्यात येत आहेत त्यांना इमारतीसाठी निधी देण्यात यावा.बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १३९२ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असल्याने शालेय विद्यार्थ्यांचे कॉम्प्युटर, स्मार्ट टीव्ही ,डिजिटल बोर्ड,एलईडी, आदि उपकरणे धुळखात पडुन असुन एकंदरीतच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्यच अंधारात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असून वीज देयके व इतर कारणांसाठी निधीची तरतूद करण्यात यावी.

## पीएम श्री.जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पालीकडून सावली ह्या नाट्यप्रयोगाचे सादरीकरण

**बीड । प्रतिनिधी**

पीएम श्री.जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पालीकडून सावली ह्या नाट्यप्रयोगाचे सादरीकरण मुख्याध्यापक श्रीयुत कांतीलाल लाड ,दिग्दर्शक मनीषा मुंडे,मनीषा खाडे, सवई मॅडम राठोड सर व इतर सर्व शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. २१ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेमध्ये पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली मधून सावली ह्या नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेमध्ये कन्हैया जाधव हा उत्कृष्ट अभिनयासाठी पात्र ठरला आहे. यावेळी सावली टीमचे व कन्हैया जाधव चे अभिनंदन करुन सत्कार करण्यात आला व या कलाकारांनी भविष्यातही घवघवीत यश संपादन करण्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

